# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

**प्रशासन शिक्षकेतर कक्ष**
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
दूरध्वनी क्र. : २५६२१०८०/८२/७६
ईमेल आयडी: adminnt@unipune.ac.in
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

**Administration Non-Teaching**
Ganeshkhind, Pune 411 007
Phone No.: 25621080/82/76
Email Id.: adminnt@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र.एएन/4063

दिनांक : 20 NOV 2025

मा.विभागप्रमुख,
विद्यापीठ प्रशासकीय व शैक्षणिक विभाग,

**विषय :- "कै. पुरुषोत्तम महादेव देशपांडे पुरस्कार", २०२६.**

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून दरवर्षी १० फेब्रुवारी रोजी **"कै. पुरुषोत्तम महादेव देशपांडे पुरस्कार"** प्रदान करण्यात येतो. सदर पुरस्कारासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातील प्रपत्रातील माहिती मागविण्यात येत आहे.

**"कै.पुरुषोत्तम महादेव देशपांडे पुरस्कार"** यासाठी शिफारस करताना, स्वयं-मूल्यांकन प्रतिवेदन प्रपत्र संबंधिताकडून भरुन घेऊन आपल्या शिफारशीसह प्रशासन शिक्षकेतर कक्षाकडे पाठविण्यात यावे. दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ रोजी सदरचा पुरस्कार हा **विद्यापीठातील गट "क"** या गटातील सेवकांसाठी असल्याने, **फक्त गट "क" मधील सेवकांच्याच शिफारशी पाठविण्यात याव्यात.** सोबत पुरस्काराचे नियम व अटी, स्वयं-मूल्यांकन व प्रतिवेदन प्रपत्र जोडले आहे.

संबंधित अधिका-याने माहिती भरल्यानंतर मा.विभागप्रमुख, प्रशासकीय / शैक्षणिक विभाग यांनी भरलेल्या माहितीची शहानिशा करुन आपल्या अभिप्रायासह सोबत जोडलेला प्रतिवेदन अहवाल बंद लिफाफ्यात गोपनीयरित्या **मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२५** पर्यंत उपकुलसचिव, प्रशासन शिक्षकेतर कक्ष यांचेकडे पाठवावा. **त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा तसेच कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर परिपत्रकास कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.**

सदर अहवाल पाठविताना लिफाफ्यावर **"कै.पुरुषोत्तम महादेव देशपांडे पुरस्कार" गट "क", स्वयं-मूल्यांकन प्रतिवेदन अहवाल"** असा स्पष्ट उल्लेख करावा. सदर पत्र व त्या सोबतचे नियम व अटी, स्वयं-मूल्यांकन व प्रतिवेदन प्रपत्र विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर Current News व Administrative Non Teaching Circulars या सदराखाली उपलब्ध आहे.

कळावे,

आपली,

**(प्रा.(डॉ.)ज्योती भाकरे)**
**प्रभारी कुलसचिव**

सोबत :- वरीलप्रमाणे.

## “कै. पुरुषोत्तम महादेव देशपांडे पुरस्कार” नियम व अटी

१) हा पुरस्कार शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून सुरू करण्यात आलेला आहे.

२) १० फेब्रुवारी या विद्यापीठ वर्धापन दिनी पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

३) पुरस्काराचे स्वरूप- स्मृतिचिन्ह, रू.२,९००/- चा धनादेश व प्रमाणपत्र असे राहील.

४) हा पुरस्कार चक्रक्रमाने गट क, गट ब आणि गट अ (तांत्रिक व अतांत्रिक) मधील कायम अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येईल.

५) अधिकारी/कर्मचारी सेवेत कायम असावा, अधिकारी/कर्मचा-याची किमान १० वर्षे नियमित वेतनश्रेणीमध्ये सेवा झालेली असावी व त्यामध्ये खंड नसावा तसेच गट “अ”, “ब” आणि “क” मधील अधिकारी/कर्मचा-यांची पुरस्कारासाठी अर्ज करण्याच्या अंतिम मुदतीच्या दिवशी विद्यापीठामध्ये संबंधितांची “अ” गटामध्ये किमान ०५ वर्षे, “ब” गटामध्ये किमान ०३ वर्षे आणि “क” गटामध्ये किमान १० वर्षे विनाखंड नियमित वेतनश्रेणीमध्ये सेवा झालेली असावी. (गट क च्या पुरस्कारासाठी गट ड ची सेवा ग्राहय धरण्यात येणार नाही.)

६) लगतच्या पाच वर्षांच्या गोपनीय अहवालांपैकी किमान तीन वर्षांचे गोपनीय अहवाल “अ” दर्जाचे असावेत, अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

७) पुरस्कार विभागून देता येणार नाही.

८) संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी वैशिष्ट्यपूर्ण/नाविन्यपूर्ण कामगिरी विद्यापीठामध्ये कार्यरत असताना केलेली असल्यास त्यासंबंधीच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात.

९) संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे मागील १० वर्षांमध्ये शैक्षणिक पात्रता वाढविली असल्यास तसेच वैशिष्ट्यपूर्ण प्रशासकीय किंवा तांत्रिक कौशल्य आत्मसात केले असल्यास, त्याची विशेष नोंद घेण्यात येईल.

१०) पुरस्कारासाठी अर्ज करण्याच्या अंतिम मुदतीच्या दिवशी संबंधित व्यक्ती त्या-त्या (गट अ, ब आणि क) पदावर कार्यरत असावी.

११) विद्यापीठाच्या शैक्षणिक/प्रशासकीय विभागातील प्रमुखांनी त्यांच्या विभागातील गट ब, आणि क मधील एकाच अधिकारी/कर्मचाऱ्याची या पुरस्कारासाठी शिफारस करावी. शिफारस करतेवेळी त्यांचे स्पष्ट अभिप्राय गोपनीयरित्या द्यावेत.

१२) अधिकारी/कर्मचा-याने यापूर्वी प्राप्त केलेले पुरस्कार, बक्षीसे, विविध प्रशिक्षण वर्ग, विशेष कामासंदर्भात गौरविले असेल, त्या पुरस्कार / प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक राहील.

१३) अधिकारी/कर्मचारी यांना संपूर्ण सेवाकाळात शिक्षा झालेली नसावी. त्यांचेवर कोणतीही विभागीय चौकशी चालू नसावी किंवा कारवाई झाली नसावी किंवा कोणतेही आरोप ठेवलेले नसावेत.

१४) अधिकारी/कर्मचा-याच्या बाबतीत कोणताही नैतिक अध:पतनचा गुन्हा शाबीत झाला नसावा/चालू नसावा अथवा त्यांचेवर कोणतीही कारवाई चालू नसावी.

१५) अर्ज पाठविण्यापूर्वी मा.विभागप्रमुखांनी अर्जात नमूद केलेली माहिती बरोबर असल्याची खात्री करुन घ्यावी. मा.विभागप्रमुखांनी दिलेली माहिती ग्राहय धरण्यात येईल.

१६) पुरस्काराशी संबंधित अधिक तपशीलासाठी आवश्यक ती प्रमाणपत्रे जोडण्यास हरकत नाही.

१७) आवश्यक सेवेच्या अनुभवाचा पुरावा दाखविणारी कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.

१८) आवश्यकता वाटल्यास माहिती तपासण्याचे अधिकार छाननी/निवड समितीस राहतील.

१९) आवश्यक त्या माहितीचा अर्जात अभाव आढळल्यास छाननी/निवड समिती अशा अर्जांचा विचार करणार नाही.

२०) प्राप्त होणा-या अर्जांची छाननी करण्यासाठी, संवाद साधण्यासाठी व अधिकाऱ्याची शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती राहील. :-

१. मा.कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले मा.व्यवस्थापन परिषदेचे सदस्य (एक)- (अध्यक्ष)

२. मा.कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले प्राचार्य/विद्यापीठातील शैक्षणिक विभागाचे प्रमुख (एक)

३. मा.कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेली प्रशासकीय क्षेत्रातील विद्यापीठाबाहेरील अनुभवी व्यक्ती (एक)

४. मा.कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेली शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती (एक)

५. मा.कुलसचिव

२१) छाननी/निवड समितीमध्ये असलेल्या सदस्यांबाबत आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

२२) संबंधित अधिकारी/कर्मचारी सेवेत असताना जास्तीत जास्त तीनदा पुरस्कारास पात्र असेल. तथापि एकदा पुरस्कार मिळाल्यानंतर पुढील पाच वर्षे पुरस्कारास पात्र असणार नाही.

२३) याव्यतिरिक्त परिस्थितीच्या तपशीलानुसार आणि वरील नियमांचे अर्थ लावण्याचे अधिकार मा. कुलगुरु यांना राहतील.

२४) योग्य (suitable) उमेदवार उपलब्ध न झाल्यास किंवा इतर कोणत्याही कारणास्तव, सदर पुरस्कार राखून ठेवण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राहतील.

२५)धनादेश, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र समक्ष घेऊन जाणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणाने पुरस्कार प्राप्त अधिकारी/कर्मचाऱ्यांस वर्धापनदिनी उपस्थित राहता आले नाही तर तशी सूचना देवून विद्यापीठ कार्यालयातून समक्ष पुरस्कार घेऊन जावा. पुरस्कार पोस्टाने पाठविण्यात येणार नाही.

२६)दिलेल्या प्रमाणपत्राचा व स्मृतिचिन्हाचा गैरवापर होणार नाही याची दक्षता पुरस्कारप्राप्त व्यक्तींनी घेणे आवश्यक आहे.

* * * * *

# कै. पुरुषोत्तम महादेव देशपांडे पुरस्कारासाठी
## मूल्यांकन प्रतिवेदन
### मा.विभागप्रमुखांनी सादर करावयाचा अहवाल.
### सेवकाची वैयक्तिक माहिती

अ) सेवकाचे नाव :- --------------------------------------------------

कायमचा पत्ता :- --------------------------------------------------

--------------------------------------------------

जन्मतारीख व वय:- --------------------------------------------------

विद्यापीठ विभाग:- --------------------------------------------------

सध्या धारण करीत असलेले पद व गट :------------------------------------------

प्रथम रूजू दिनांक व त्या वेळचे पद :- ----------------------------------------

एकूण सेवा कालावधी :- --------------------------------------------

कोणकोणत्या पदावर व किती वर्षे सेवा झाली :- ----------------------------------

| पद | संस्था | कालखंड |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| एकूण | | |

शैक्षणिक अर्हता --------------------------------------------

ब) इतर

सेवकाची विश्वासार्हता :- ---------------------------------

सर्वसाधारण वर्तणुकीबाबत अभिप्राय :- ---------------------------------

कार्यतत्पर आहे काय ? :- ---------------------------------

कामातील अचूकता :- ---------------------------------

कामात नियमितपणा :- ---------------------------------

सहभागाची भावना :- ---------------------------------

कामात व्यवस्थितपणा :- ---------------------------------

वरिष्ठांशी वर्तणूक :- ---------------------------------

**सहका-यांशी वर्तणूक** :- ------------------------------------

**कामाची विश्वासार्हता** :- --------------------------------------

**कामाची सखोल माहिती** :- --------------------------------------

**कार्यालयीन कामाची आत्मियता** :- --------------------------------------

**संगणकाचे ज्ञान** :- --------------------------------------

**विद्यार्थी, पालक व समाज यांच्याशी** :- --- ---------------------------------

**असलेले संबंध**

**सहकार्याची भावना** :- ------------------------------------

**कामातील स्वयंस्फूर्तता** :- ------------------------------------

**विद्यापीठाबद्दल बांधिलकी** :- ------------------------------ ------
**(थोडक्यात अभिप्राय)**

**विभागप्रमुखाचे सेवकाबाबतचे मूल्यांकन** :- ------------------------------ --
**(योग्य त्या समर्थनासह)** -------------------------------

-------------------------------

-------------------------------

**वरील माहिती व्यतिरिक्त काही सांगावयाचे असल्यास :-** ------------------------------
**(आवश्यक असल्यास स्वतंत्र टिपणी द्यावी.)** -----------------------------

-----------------------------

-----------------------------

**शिफारस**

----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

वरील माहिती उपलब्ध कागदपत्रे, प्रत्यक्ष पाहणी व अन्य माध्यमातून ज्ञात आहे. ती सत्य असून पुरस्कारासाठी मी त्यांची शिफारस करीत आहे.

**दिनांक :** **विभागप्रमुख**

### प्रशासन शिक्षकेतर कक्षाने भरावयाची माहिती-

अ) मागील पाच वर्षांचे गोपनीय अहवालाचा दर्जा :- (वर्षनिहाय)

| अ.क्र. | वर्ष | गोपनीय अहवालाचा दर्जा |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |

ब) विभागीय चौकशी व न्यायालयीन कारवाई चालू आहे का :-----------------------

-----------------------------------------------------------------

उपकुलसचिव
प्रशासन शिक्षकेतर कक्ष
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**“ कै.पुरुषोत्तम महादेव देशपांडे पुरस्कार ”**

**स्वयंमूल्यांकन अहवाल.**

**(संबंधित सेवकाने भरावयाची माहिती)**

**-: वैयक्तिक माहिती :-**

**फोटो**

**अ)**

नाव :- ______________________

जन्मतारीख :- ______________________

वय :- ______________________

सध्याचा पत्ता :- ______________________

______________________

कायमचा पत्ता :- ______________________

______________________

कामाचा विभाग :- ______________________

सध्याचे पद आणि गट :- ______________________

प्रथम नियुक्तीचा दिनांक व पद :- ______________________

एकूण सेवा :- ______________________

शैक्षणिक अर्हता :- ______________________

## -: <u>इतर माहिती</u> :-

**ब)**

धारण केलेली पदे, विभाग, गट व कालावधी

| अ.क्र. | पदनाम | गट | विभाग/संस्था | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

संगणकाचे ज्ञान आहे का? :- ________________________________
(विशेष माहिती द्यावी
प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.)

सेवाअंतर्गत प्रशिक्षण व तपशील :- ________________________________

सेवाकालावधीत शिक्षा झालेली आहे का? :- ----------------------------------------

क्राईम-ऑफेन्स/नैतिक अध:पतन विषयक काही गुन्हयाची नोंद आहे काय? आणि तो सिध्द झाला आहे काय? ________________________________
________________________________

इतर काही बक्षीसे, पारितोषिके, सन्मान मिळालेले आहेत का ? असल्यास त्याच्या साक्षांकित छायांकित प्रती जोडाव्यात. :- ---------------------------

प्रतिष्ठित सन्माननीय व्यक्तींनी दिलेली पुरस्कार पत्रे :- ------------------------------
(निवडक पत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.)

कार्यरत असताना गौरवास्पद कामगिरी केली असल्यास उल्लेख करावा. :- --------------------------------

क्रीडा, संगीत, साहित्य, लेखन, वाचन, सांस्कृतिक कार्यक्रम इ.सहभाग(संस्थेत व संस्थेबाहेर) :- ------------------------------

यापूर्वी मिळालेली बक्षिसे, पारितोषिके सन्मान (संस्थेत व संस्थेबाहेर) :- --------------------------------------------

सामाजिक कार्यात सहभाग आहे का? :- ______________________________
(उदा. राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता
प्रौढ शिक्षण, दुष्काळ निवारण, राष्ट्रीय
साक्षरता अभियान इत्यादी )

इतर माहिती असल्यास :- ______________________________

या पुरस्कारासाठी आपली योग्यता :- ______________________________
थोडक्यात नमूद करावी. ______________________________

---------------------------------------------

---------------------------------------------

वर मी दिलेली सर्व माहिती खरी असून कोणताही तपशील खोटा वा दिशाभूल करणारा आढळल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी माझी असेल.

सही :-

नाव :- ( ____________________ )

दिनांक :-

ठिकाण :-